सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १४५ | रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com


### आजचे अभीष्टचिंतन





**श्री. विवेकभाऊ देशमुख**
निवृत्त बँक अधिकारी



**श्री. निखिल सूर्यवंशी**
श्री मंगळग्रह मंदिर सेवेकरी



**श्री. अतुल दीक्षित**
श्री मंगळग्रह मंदिर पुरोहित

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

# अमळनेरला आज भूमी सुपोषण चळवळ जनजागर महाशोभायात्रा आयोजन-नियोजनाची बैठक

## खासदार श्रीमती स्मिताताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील यांची उपस्थिती लाभणार




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी अमळनेर शहरात 'माझा-संकल्प-भूमी सुपोषण' चळवळ जनजागर महाशोभायात्रा काढण्याचे सुनिश्चित केले आहे. त्यासाठी येथील श्री मंगळग्रह मंदिरात रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता आयोजन-नियोजनाची बैठक आयोजित केली आहे. या बैठकीसाठी खासदार श्रीमती स्मिताताई वाघ यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, आमदार अनिलदादा पाटील अध्यक्षस्थानी असतील.

अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने काळाची गरज असलेली भूमी सुपोषण चळवळ देशभर प्रचारीत व प्रसारीत करण्याचे सुनिश्चित करण्यात आले आहे. 'मेरा संकल्प-भूमी सुपोषण' या चळवळीचा शुभारंभ श्री भूमी मातेच्या वाढदिवशी अर्थात वर्ष प्रतिपदा व गुढीपाडवा-हिंदू नववर्षारंभ अर्थात गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ रोजी होणार आहे. त्यासाठी माननीय केंद्रीय कृषिमंत्री ना. श्री. शिवराजसिंहजी चौहान अमळनेर येथे श्री मंगळग्रह मंदिरात येणार आहेत.

सदर ऐतिहासिक उपक्रम नितांत सुंदर, नियोजनबद्ध, अत्यंत आखीव-राखीव असावा, अशी आमची मनस्वी इच्छा असल्याने आपल्यासारख्या महानुभावांचे मार्गदर्शन लाभावे, यासाठीच या आयोजन-नियोजन बैठकीचे आयोजन केले आहे. समाजातील सर्व क्षेत्रांतील मान्यवर व माता-भगिनींनी अधिकाधिक संख्येने या बैठकीस आवर्जून उपस्थिती द्यावी, असे आवाहन अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांनी केले आहे.

दरम्यान, सदर दिवशी महाशिवरात्र आहे. त्यामुळे बैठकीनंतर सर्वांसाठी उपवासाच्या भोजन-महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

### अमृत भारत स्टेशन विकास योजना

# अमळनेर रेल्वे स्थानकाचे काम प्रगतीपथावर

## वातानुकूलित आरामकक्षासह लिफ्टने स्थानक होणार सर्व सुविधायुक्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारतीय रेल्वेच्या "अमृत भारत स्टेशन" योजनेंतर्गत महाराष्ट्रातील एकूण १३२ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेद्वारे रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण होत आहे. यात अमळनेर रेल्वे स्थानकाचाही समावेश करण्यात आला आहे. यासाठी केंद्राकडून २९ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर येथील रेल्वे स्थानकाचे काम प्रगतीपथावर आहे. वातानुकूलित आरामकक्ष, लिफ्टने स्थानक सर्वसुविधा युक्त होत आहे. या विकासकामांमुळे रेल्वे स्थानकाचा संपूर्ण चेहरामोहरा बदलणार आहे.

अमृत भारत स्टेशन योजनेचे उद्दिष्ट हे स्थानकावर आवश्यक असलेल्या सुविधांपेक्षा जास्त सुविधा वाढवणे आहे. या योजनेचा उद्देश प्रत्येक स्थानक आधुनिक आणि सर्व सोयीसुविधायुक्त करणे आहे. यामध्ये प्रवाशांना आवश्यक असणाऱ्या विविध सुविधा अधिक प्रवाभीपणे देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अमळनेर रेल्वे स्थानकाचे भव्य प्रवेशद्वाराचे काम सुरू आहे. आतील इमारतींचे नुतनीकरण करण्यात येत आहे. दोन लिफ्टचे निर्माण सुरू आहे. त्यामुळे कनेक्टिव्हिटी सुलभ होणार आहे. वातानुकूलित आरामकक्षाचे कामही प्रगतीपथावर आहे. वाहनांसाठी भव्य पार्किंग उभारण्यात येत आहे.



*अमळनेर : अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत सुरू असलेले रेल्वे स्थानकाचे नुतनीकरणाचे काम. (छायाचित्र : रजनीकांत पाटील )*

### मिळणाऱ्या सुविधा

अमृत भारत स्टेशन योजनेमधील स्थानकांवर प्रवेश आणि बाहेर पडण्याचा मार्ग वेगळा आणि प्रशस्त, फिरणारे क्षेत्र, प्रतीक्षालय, शौचालये, लिफ्ट, स्वच्छता, मोफत वाय-फाय, 'वन स्टेशन वन प्रोडक्ट' सारख्या योजनांद्वारे स्थानिक उत्पादनांसाठी किओस्क, चांगली प्रवासी माहिती प्रणाली, एक्झिक्युटिव्ह लाउंज, बिझनेस हब, अद्यावत बालोद्यान, व्यवसाय बैठकांसाठी नामांकित जागा, लँडस्केपिंग इत्यादी सुविधांमध्ये सुधारणा समाविष्ट आहे.

"अमृत भारत स्टेशन विकास योजनेंतर्गत अमळनेर रेल्वे स्थानकाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत काम पूर्ण करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. अमळनेरकरांसाठी ही अभिमानाची बाब आहे. रेल्वे स्थानकाच्या नुतनीकरणाने रेल्वे स्थानकाचा चेहरामोहरा बदलणार आहे. सध्या ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. रेल्वे स्थानकात काम सुरू असले तरी प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी प्रयत्नशील आहोत. प्रवाशांनीही रेल्वे प्रशासनास सहकार्य करावे.
– **अनिल शिंदे**, स्टेशनद मास्तर, अमळनेर रेल्वे स्थानक.




*अमळनेर : महाशिवरात्रीनिमित्त श्री मंगळग्रह मंदिरात करण्यात आलेली फुलांची आकर्षक सजावट. (छायाचित्रे : नीतेश बारी)*

# महाशिवरात्रीनिमित्त श्री मंगळग्रह मंदिरात आज रुद्राभिषेक व भजन संध्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाशिवरात्रीनिमित्त येथील श्री मंगळग्रह मंदिरात रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता गोरज मुहूर्तावर रुद्राभिषेक शृंगार सेवा आयोजित करण्यात आली आहे.

सायंकाळी ५ ते ७ या वेळेत विधीवत रुद्राभिषेक, पूजन व शृंगार सेवा पार पडणार आहे. वेदमंत्रांच्या जयघोषात अभिषेक केला जाणार आहे. त्यानंतर सायंकाळी ७ ते रात्री ९ या वेळेत भजन संध्येला प्रारंभ होईल. स्थानिक भजन मंडळांच्या सहभागातून महादेवांच्या नामस्मरणाने परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. महाशिवरात्रीनिमित्त मंदिर परिसरात आकर्षक सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.



### सरपंच श्रीमती राजश्रीताई पाटलांची सामाजिक बांधिलकी

# हिंगोणे खु. प्र. ज. ग्रामपंचायत थकबाकीमुक्त

## स्वखर्चातून भरला संपूर्ण गावाचा कर अन् कराच्या पैशातून भरले वीज बिलही



*हिंगोणे खुर्द प्र. ज. (ता. अमळनेर) : ग्रामपंचायत थकबाकीमुक्त जाहीर झाल्यानंतर उपस्थित आमदार अनिलदादा पाटील, सौ. जयश्रीताई पाटील, लोकनियुक्त सरपंच श्रीमती राजश्रीताई पाटील व ग्रामस्थ.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील हिंगोणे खु. प्र. ज.च्या लोकनियुक्त सरपंच श्रीमती राजश्रीताई राजेश पाटील यांच्या संकल्पनेतून हिंगोणे ग्रामपंचायत १०० टक्के थकबाकीमुक्त झाली आहे. श्रीमती पाटील यांनी स्वखर्चातून संपूर्ण गावाचा कर भरला असून, त्या कराच्या पैशातून थकीत वीज बिल देखील भरले गेले आहे. त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे तालुक्यत कौतुक होत आहे.

हिंगोणे खू. प्र. ज ग्रामपंचायतीने लाईट बिलाच्या थकीत रकमेचा धनादेश नुकताच विद्युत विभागाकडे सुपूर्द केला. आमदार अनिलदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीने हा निर्णय घेतला आहे. आता हिंगोणे ग्रामपंचायत १०० टक्के थकबाकीमुक्त झाली असल्याने ग्रामस्थानी समाधान व्यक्त केले आहे. सरपंच राजश्री पाटील यांनी गावच्या सरपंचपदाची धुरा सांभाळल्यानंतर गावासाठी अनेकविध स्तुत्य उपक्रम राबविले. यात प्रामुख्याने गाव दरवाजा, नवीन स्मशानभूमीचे बांधकाम, ग्रामपंचायत कार्यालय, पाणीपुरवठा योजना, संपूर्ण गावात रस्ता काँक्रीटीकरण, आधुनिक व डिजिटल अंगणवाडी, शनिदेव मंदिराचे बांधकाम, महादेव मंदिराचा जीर्णोध्दार ही कामे प्रामुख्याने करण्यात आली. या व इतर विकासकामांमुळे आपोआप गावाची वाटचाल विकासाच्या दिशेने सुरू झाली.

विकासकामासोबतच श्रीमती राजश्रीताई पाटील यांनी स्वखर्चाने संपुर्ण गावाची ९ लाख रुपये घरपट्टी व पाणीपट्टी भरली. यामुळे पंचायतीला कर स्वरूपाने चांगले पैसे मिळाले आणि दुसऱ्या बाजूला ग्रामस्थांना आर्थिक झळ सोसावी लागली नाही.

याच घरपट्टी व पाणीपट्टीच्या पैशातून गावाकडे थकित असलेले ७ लाख ८० हजार रुपये बिलाचा धनादेश महावितरणचे अमळगाव कक्षाचे सहाय्यक अभियंता उज्वल पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी आमदार अनिलदादा पाटील हे स्वतः उपस्थित होते. त्यांनी देखील ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी ग्रामसेवक पवनकुमार वाघ, वायरमन प्रमोद सैंदाणे उपस्थित होते.

# जि. प. निवडणुका दिवाळीनंतरच ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यातील बारा जिल्हा परिषदांच्या निवडणुका पार पडल्या आहेत. मात्र, आरक्षणामुळे उर्वरित जिल्हा परिषदेच्या निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. यात जळगाव जिल्हा परिषदेचा देखील समावेश असून, ५४ टक्के आरक्षण असल्यामुळे ही निवडणूक सर्वोच्च न्यायालयाकडून सुनावणीत स्पष्ट मार्गदर्शन मिळाले नसल्याने अद्याप देखील निवडणुकांचा पेच कायम आहे. आता येत्या दोन महिन्यात या निवडणुका होणे शक्य नसल्याचे चित्र सध्या तरी दिसून येत आहे.

राज्यातील बारा जिल्हा परिषदांसाठी मागील आठवड्यात निवडणूक प्रक्रिया होऊन निकाल देखील जाहीर झाले आहेत. दरम्यान, जळगाव जिल्हा परिषदेचे ५४ टक्के आरक्षण असल्यामुळे पहिल्या टप्प्यातील जिल्हा परिषदांच्या निवडणुकांसोबत कार्यक्रम लागला नाही. राज्यातील उर्वरित २२ जिल्हा परिषदांसोबतच जळगाव जिल्हा परिषदेची निवडणूक होणार आहे.


**पान २ वर**

## संपादकीय

# प्रेमाचा दिखावा नको, नात्यांचा विश्वास हवा

आज १४ फेब्रुवारी अर्थात व्हॅलेंटाईन डे हा दिवस जगभर प्रेम व्यक्त करण्याचा म्हणून मानला जातो. या दिवसाची परंपरा सेंट व्हॅलेंटाईन यांच्या स्मरणार्थ सुरू झाली. सेंट व्हॅलेंटाईन एका पुण्यकर्मासाठी ओळखले जात होते. त्यांच्या काळात जेलमधील कैद्यांना कुटुंबाशी संपर्क साधायला अडचण होती. त्यांनी गुप्तपणे कैद्यांच्या पत्रांची देवाणघेवाण केली आणि लोकांच्या जीवनात आशेचा आणि प्रेमाचा संदेश पसरवला. परंतु आजच्या काळात मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे अशी माध्यमे फारशी आवश्यक नाहीत. तरीही तरुण वर्गात व्हॅलेंटाईनच्या नावाने प्रेमदिन साजरा केला जातो. सध्याच्या काळात हा दिवस मुख्यतः व्यापारी स्वरूप घेऊन दिसतो. महागडे भेटकार्ड, फुले, चॉकलेट आणि सामाजिक माध्यमांवरील मोठा प्रचार यामुळे प्रेमाचा खरा अर्थ गळून जातो. अनेक वेळा प्रेम हा फक्त आकर्षण किंवा वैयक्तिक भावनेपुरता मर्यादित होतो. काही लोकांमध्ये तो स्वैराचार, तत्काळ समाधान आणि दर्शनी मोहाचे माध्यम बनतो. अशा प्रकारच्या प्रेमामुळे समाजातील मूल्ये, पारंपरिक संस्कार आणि नात्यांतील आदर गळून जातो. परंतु प्रेमाचा खरा अर्थ म्हणजे निष्ठा, विश्वास, त्याग, करुणा, समंजसपणा आणि एकमेकांबद्दल आदर.

आपल्या सांस्कृतिक परंपरेत श्रीकृष्ण–राधेचे नितळ प्रेम, तसेच मीराबाई यांचे भक्तिपूर्ण प्रेम हे आदर्श उदाहरण मानले जाते. हे प्रेम केवळ भावनात्मक नसून आत्मीय, निष्ठावान आणि निःस्वार्थ होते. आपल्या कुटुंब, समाज आणि जीवनातील नात्यांमध्ये प्रेम हे केवळ एक दिवसापुरते मर्यादित नसावे. ते आचरणातून व्यक्त व्हावे. पालकांची सेवा, वृद्धांची काळजी, गरिबांची मदत, मित्रांबद्दल प्रामाणिकपणा आणि जोडीदाराच्या बाबतीतील विश्वास यामुळेच प्रेमाची खरी अनुभूती मिळते.

सध्याच्या काळातील प्रेमाचे स्वरूप अनेकदा व्यावहारिक आणि तकलादू झाले आहे. सोशल मीडिया, व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्राम यासारख्या माध्यमांवर प्रेम दाखविण्याची प्रवृत्ती वाढली आहे. काही महिन्यांपूर्वी नांदेडमध्ये १९ वर्षीय दलित तरुण सक्षम ताटे याचा आंतरजातीय प्रेम प्रकरणातून खून झाला. प्रेयसीच्या कुटुंबाचा विरोध आणि समाजातील घटक यामुळे प्रेमाचे नाते हिंसकतेच्या फंदात अडकले. पण आचल हिचे सक्षमवर खरे प्रेम असल्याने तिने त्याच्या मृतदेहाशी विवाह केला. तसेच मराठी चित्रपट सैराटमध्येही आर्ची–परश्या यांच्या प्रेमकथेत जातीय भेद, सामाजिक दबाव आणि वाईट परिस्थितीमुळे प्रेमाचा संहार दाखविला आहे. या उदाहरणांमुळे स्पष्ट होते, की प्रेमाच्या नावाखाली जर जबाबदारी, आदर आणि संयम नसेल, तर त्याचे परिणाम भयानक होऊ शकतात.

प्रेमाच्या नावाखाली फसवणूक, विवाहबाह्य संबंध, डॉमिनेटिंग वृत्ती, सोशल मीडियावरील दिखावा आणि क्षणिक आकर्षण याही घटना वाढताना दिसतात. नात्यातील असुरक्षितता, मालकीची भावना आणि अवास्तव अपेक्षा यामुळे तणाव वाढतो. काही प्रकरणांत तर नकार सहन न झाल्याने हिंसक कृत्ये घडतात. ही प्रवृत्ती प्रेमाचा नव्हे, तर अहंकाराचा आणि असंतुलित भावनांचा परिणाम आहे. पूर्वीचे प्रेम आदर, विश्वास आणि संयम यावर टिकून होते, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरेल. तरीही नात्यांची जपणूक करण्याची वृत्ती अधिक दृढ होती, हे मान्य करावे लागेल. प्रेम हे केवळ एका दिवसापुरते साजरे करण्याची बाब नाही. पालकांची सेवा, जोडीदाराचा सन्मान, मित्रांविषयी प्रामाणिकपणा आणि समाजातील गरजूंबद्दल करुणा या सर्वांमध्ये प्रेमाची खरी अनुभूती आहे. व्हॅलेंटाईन डे हा विरोध किंवा अंधानुकरण यांचा विषय न बनता आत्मपरीक्षणाचा दिवस व्हावा. आपल्याला लाभलेल्या नात्यांचे मोल ओळखून त्यांना जपणे, विश्वासाने आणि जबाबदारीने जगणे हाच प्रेम दिनाचा खरा संदेश आहे.

# ‘व्हीनस ऑफ स्क्रीन’ : मधुबाला

जयंती विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलिवूडची मर्लिन मनरो, सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान, चित्रपटसृष्टीलाच नव्हे तर भारतातील सर्वांत सुंदर महिला असे ज्यांचे वर्णन केले जाते त्या मधुबाला यांचा शनिवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी सर्वत्र जन्मदिन साजरा झाला. त्यानिमित्त...

१४ फेब्रुवारी १९३३ रोजी दिल्लीच्या एका पश्तून कुटुंबात जन्मलेल्या मधुबाला यांचे मूळ नाव मुमताज बेगम जहाँ देहलवी असे म्हणतात, की मधुबाला यांच्या जन्मानंतर एका व्यक्तीने त्यांच्याबाबत असे भविष्य वर्तविले होते, की त्या आयुष्यात खूप ख्याती मिळवतील. पैसा अडका, धनसंपत्ती मिळवतील. पण त्यांचे आयुष्य अतिशय दुःखी असेल. या भविष्यावर विश्वास ठेवून त्यांचे वडील त्यांना मुंबईला घेऊन आले.

वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे १९४२ मध्ये मधुबाला यांनी बेबी मुमताज या नावाने चित्रपटात भूमिका करण्यास सुरूवात केली. बाबूराव पटेल आणि डॉ. सुशीलाराणी पटेल या दाम्पत्याचा मधुबालावर विशेष लोभ होता. त्यांनीच त्यांना मधुबाला हे नाव दिले. बालवयातच चित्रपटात काम करू लागल्याने मधुबाला या शाळेत जाऊ शकल्या नाहीत. त्यामुळे त्यांना इंग्रजी येत नसे. मात्र उर्दू भाषा येत होती. चित्रपटात भूमिका करण्यास सुरूवात केल्यावर मात्र त्यांनी इंग्रजीवर चांगले प्रभुत्व मिळविले. त्यांचे वडील कडक शिस्तीचे असल्याने त्या कधीही चित्रपटाच्या प्रीमियरला उपस्थित राहत नसत. १९४७ मध्ये आलेल्या निलकमल या चित्रपटात त्या पहिल्यांदा अभिनेत्री म्हणून झळकल्या. याच वर्षी त्यांचा आणखी एक चित्रपट प्रदर्शित झाला. पुढच्याच वर्षी म्हणजे १९४८ मध्ये त्यांचा अमर प्रेम नावाचा चित्रपट आला. या सर्व चित्रपटात राज कपूर हे त्यांचे नायक होते. त्यानंतर बॉम्बे टॉकीजचा महल नावाचा चित्रपट आला. हा चित्रपट सुपर डुपर हिट झाला. यानंतर मात्र मधुबाला यांनी मागे वळून पाहिले नाही. अशोक कुमार, दिलीपकुमार, देवानंद या त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांसह त्यांनी भूमिका केल्या. अल्पावधीतच त्या बॉलिवूडच्या आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. त्यांनी आपल्या करिअरमध्ये ६६ चित्रपटात भूमिका केल्या. बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार दिलीपकुमार यांच्यावर त्या एकतर्फी प्रेम करत असत. मुघले आझम चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान त्यांनी दिलीपकुमार यांच्याशी लग्न करण्याची इच्छा बोलून दाखविली. मात्र दिलीपकुमार यांनी लग्नास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर त्यांनी गायक किशोरकुमार यांच्याशी विवाह केला. मधुबाला या किशोरकुमार यांच्या चौथ्या पत्नी होत्या. किशोरकुमार यांच्याबरोबरचे लग्न ही बाब दोघांसाठी कसेतरी जगण्यासाठी केलेली तडजोड होती. त्यामुळेच दोघांचे जास्त पटत नसे.

मधुबाला यांना हृदयरोग होता आणि १९५० पासून त्यांच्यावर उपचार सुरू होतो. पण त्यांनी ही गोष्ट सर्वांपासून लपवून ठेवली होती. त्यांची प्रकृती बरी नसतानाही त्यांनी निर्माते दिग्दर्शकांचे नुकसान होऊ नये म्हणून साइन केलेले चित्रपट पूर्ण केले. या चित्रपटात असे कोठेही जाणवत नव्हते की त्या आजारी आहेत. हृदयरोगासोबत त्यांना असा एक आजार होता की ज्या आजाराने शरीरात प्रमाणापेक्षा अधिक रक्त तयार होत असे व त्यांच्या नाकातून व तोंडातून रक्तस्त्राव होत असे.

इतक्या दुर्धर आजारातही त्यांनी चित्रपटात काम करणे सुरूच ठेवले. मुघले आझम या चित्रपटातील एका दृश्यात त्यांना दोरखंडाने बांधले होते. पण त्यांनी प्रकृती बरी नसतानाही ते सहन केले. त्या म्हणायच्या, की अनारकलीची भूमिका करण्याची संधी पुन्हा मिळणार नाही. त्या इतक्या प्रोफेशनल होत्या की आपले काम अतिशय तन्मयतेने करत असत. प्रसंगी जेवण झाले नाही तरी चालेल. थर्ड क्लासने प्रवास करावा लागला तरी चालेल. पण काम वेळेच्या वेळी पूर्ण करण्याचा त्यांचा आग्रह असे. त्यांच्या याच कामाच्या निष्ठेमुळे त्या महान अभिनेत्री बनल्या. अमेरिकेच्या थिएटर आर्टस् या जगप्रसिद्ध मासिकाने त्यांचा जगातील सर्वांत मोठी अभिनेत्री म्हणून गौरव केला होता.

त्यांच्या सौंदर्याची जादूच अशी होती, की बघणारा हरवून जायचा. पण हेच आरस्पानी सौंदर्य त्यांच्यासाठी मात्र शापित ठरले. वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी अर्थात २३ फेब्रुवारी १९६९ साली त्यांनी जगाचा निरोप घेतला. मधुबाला यांना व्हीनस ऑफ स्क्रीन असे म्हटले जाते. मात्र त्यांच्या याच आरस्पानी सौंदर्याला अल्पायुष्याचा शाप होता. आज त्या जाऊन ५७ वर्षे झाले. मात्र त्यांच्या सौंदर्याची आणि अभिनयाची जादू आजही कायम आहे. सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान असलेल्या मधुबाला यांना जयंती दिनानिमित्त दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे विनम्र अभिवादन!



## सॅटेलाइट पाहणी

# जळगावात ४४ हजार हेक्टरवरील बनावट केळी पीक विमा उघड

### ३७ कोटी जप्त; जिल्हाधिकारी रोहन घुगे यांची माहिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जळगाव जिल्ह्यात सॅटॅलाइट पाहणीतून ४४ हजार हेक्टरवरील बनावट केळी पीक विमा घोटाळा उघड झाला आहे. प्रशासनाने २१७ कोटींचे संभाव्य नुकसान टाळले असून ३७ कोटींची रक्कम जप्त केली आहे. जळगाव जिल्ह्यात सॅटॅलाइट पाहणीतून ४४ हजार हेक्टरवरील बनावट केळी पीक विमा घोटाळा उघड झाला आहे.

प्रशासनाने २१७ कोटींचे संभाव्य नुकसान टाळले असून ३७ कोटींची रक्कम जप्त केली आहे. २०२५–२६ या वर्षात मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल २७,२५९ अर्जांची वाढ नोंदवली गेली. सुमारे २८ हजार हेक्टर क्षेत्र केळी लागवडीखाली असल्याचे दाखवण्यात आले. अचानक झालेल्या या वाढीमुळे कृषी विभागाने सॅटेलाइटच्या माध्यमातून सखोल तपासणी केली असता चोपडा, मुक्ताईनगर, यावल आणि रावेर तालुक्यांत मोठ्या प्रमाणावर अनियमितता आढळली. प्रत्यक्षात केळी लागवड नसताना अर्ज करणे, लागवड क्षेत्र जास्त दाखवणे, जिओ–टॅग छायाचित्रांमध्ये फेरफार करणे आणि इतरांच्या कागदपत्रांचा वापर करणे असे प्रकार समोर आले. या प्रकरणात विमा हप्त्याच्या स्वरूपात जमा झालेले सुमारे ३७ कोटी ४३ लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत. वेळेत पडताळणी झाल्यामुळे राज्य सरकारचे १२३ कोटी ५३ लाख आणि केंद्र सरकारचे ९३ कोटी ५८ लाख, असे एकूण सुमारे २१७ कोटी रुपयांचे संभाव्य नुकसान टळल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. संबंधित बोगस अर्जदारांवर कठोर कारवाईचे संकेत कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास रस्तोगी यांनी दिले आहेत.

# श्रीक्षेत्र कपिलेश्वर येथे आजपासून यात्रोत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सूर्यकन्या तापी, गुप्त गंगा व पांझरा नदीच्या संगमावरील श्रीक्षेत्र कपिलेश्वर येथे महाशिवरात्रीनिमित्त रविवार, दि. १५ फेब्रुवारीपासून यात्रोत्सवास सुरुवात होणार आहे. पंधरा दिवस चालणाऱ्या या यात्रोत्सवास भाविकांची मोठी गर्दी असते.

**आकर्षक रोषणाई**

मंदिराचे डाव्या बाजूला श्रीराम मंदिर, समोरच हनुमान मंदिर, उजव्या हाताला कुलस्वामिनी आशापुरी मंदिर, मंदिर पायथ्याशी तापी नदीचे व पांझरा नदीचे सगमस्थळ असा विलोभनीय व निसर्गरम्य परिसर येथे आहे. महाशिवरात्रीला जिल्ह्यासह मध्यप्रदेश, गुजरात राज्यातून ही भाविक महाशिवरात्रीला दर्शनासाठी येतात. यानिमित्ताने मंदिरावर आकर्षक रोषणाई करण्यात आल्याने मंदिर परिसरात झगमगाट दिसत आहे. तर भक्तांसाठी होम हवन, विविध धार्मिक विधीसाठी तीन ठिकाणी मंडप, वाहन पार्किंग व भाविकांना दर्शन सुलभ घेता यावे म्हणून दर्शनरांगेची व्यवस्था पूर्ण करण्यात आली आहे.

**दर्शनासाठी जादा बस**

अमळनेर आगारातून श्रीक्षेत्र कपिलेश्वर मंदिरापर्यंत जादा बस सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शिंदखेडा व शिरपूर येथून ही पलीकडील मुडावद व भोरटेक पर्यंत खासगी वाहने प्रवाशांना सेवा देणार आहे.

# जिल्हा परिषद निवडणुका दिवाळीनंतरच ?

**पान १ वरून**

त्यासाठी न्यायालयाच्या अंतिम निर्णयावर निवडणूक प्रक्रिया अवलंबून आहे.

**प्रतीक्षा कायम**

जिल्हा परिषदेच्या गट व गणाची रचना यापूर्वी जाहीर झाली असून, गटनिहाय मतदार याद्या देखील प्रसिद्ध झाल्या आहेत. मात्र, आरक्षण पुनर्रचनेबाबत दाखल झालेल्या याचिकेमुळे ५० टक्क्यांच्या वर आरक्षण असलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुका खोळंबल्या आहेत. जळगाव जिल्ह्यातील ६८ गट व १३६ गणासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. अनेकांची यासाठी तयारी देखील झाली असून, इच्छुक उमेदवारांना निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची प्रतीक्षा आहे.

**दिवाळीनंतरच कार्यक्रम**

जिल्हा परिषदेवर प्रशासक बसण्यास चार वर्षांचा कालावधी पूर्ण होत आहे. कोरोना गेल्यानंतर निवडणुका लागणार अशी आशा होती. ही प्रतीक्षा गेल्या तीन– चार वर्षांपासून कायम आहे. आता देखील डिसेंबर किंवा जानेवारीमध्ये निवडणुका होतील, अशी अपेक्षा सर्वांना होती. मात्र सर्वोच्च न्यायालयात निर्माण झालेल्या आरक्षणामुळे निवडणुकांना ब्रेक लागला आहे. यानंतर उर्वरित जिल्हा परिषदांच्या निवडणुका देखील पार पडल्या आहेत. तर आता एप्रिल–मेमध्ये होणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र अद्याप न्यायालयाकडून स्पष्ट निर्णय आला नसल्याने येत्या दोन महिन्यात या निवडणुका होणे शक्य नाही.

**जिल्हा परिषदेचे आरक्षण बदलणार**

जिल्हा परिषद गटांमधील आरक्षणात तसेच चार पंचायत समित्यांतर्गत गणांच्या आरक्षणातही फेरबदल करावा लागणार आहे. आरक्षणातील फेरबदल आता कुणाला तारणार आणि कुणाला मारक ठरणार ? हे फेररचना झाल्यानंतर स्पष्ट होणार आहे. त्यामुळे फेररचनेमुळे इच्छुकांच्या आशा पुन्हा पल्लवीत झाल्या आहे. मात्र निवडणूक लांबल्याने इच्छुक उमेदवारांची उत्सुकता ताणली गेली आहे.

# एकास मारहाण; दोघांवर गुन्हा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील निंभोरा येथे किरकोळ वादातून दोघांनी एकास चाकू व फायटरने मारहाण केली आहे. यात तरूण जखमी झाला आहे. ही घटना मंगळवार, दि. १० फेब्रुवारी रोजी रात्री आठ वाजता घडली. या प्रकरणी दोन जणांवर मारवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी सांगितले, की प्रमोद बापूराव सैंदाणे (वय ४३, रा. निंभोरा) हे आपल्या घरात असताना कृष्णा बाळू भिल व रोहित अरुण वाघ हे दोघे त्यांना शिवीगाळ करीत होते. प्रमोद यांनी शिवीगाळ करू नका असे सांगितल्याचा राग येऊन कृष्णा भिल याने प्रमोद सैंदाणे यांच्यावर चाकूने वार केला. त्यानंतर रोहित वाघने लाथा– बुक्यांनी मारहाण केली. यात प्रमोद सैंदाणे गंभीर जखमी झाले. त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## निधन वार्ता

### शशिकांत पाटील

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील आर. के. नगरमधील रहिवासी शशिकांत साहेबराव पाटील (वय ७०) यांचे शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री दीड वाजेच्या सुमारास अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक अश्वमेघ पाटील व पियूष पाटील यांचे ते वडील होत.

# सावधान..! लष्करी जवानांच्या नावाचा वापर करून तुमची लूट होऊ शकते...!

## किमती फर्निचर स्वस्त देतो म्हणून भावनिक आवाहन करून फसवणूक!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेरकर नागरिकांना दै. ‘महातेज’तर्फे जाहीर आवाहन करण्यात येते, की गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर एक भयंकर ‘सायबर स्कॅम’ सक्रिय झाला आहे. फसवणूक करणारे गुन्हेगार भारतीय सैन्यदल किंवा केंद्रीय राखीव दलाचे अधिकारी असल्याचे खोटे भासवून सर्वसामान्यांना लुटत आहेत. आपल्यातीलच एका मित्राला नुकताच या टोळीने २३ हजार रुपयांचा गंडा घातला आहे.

गुन्हेगारांची कार्यपद्धती अशी असते की आधी फ्रीज, सोफा, वॉशिंग मशीन, लॅपटॉप किंवा महागडी सायकल यांसारख्या वस्तू अत्यंत स्वस्त दरात (उदा.– सर्व वस्तू फक्त ८०–९० हजारांत) विकण्याचे मेसेज पाठविले जातात. ‘माझी आर्मीतून बदली झाली आहे, सामान नेणे परवडत नाही, म्हणून तातडीने विकायचे आहे,’ असे भावनिक कारण सांगितले जाते. या व्यक्ती विश्वास संपादन करण्यासाठी सैनिकांचे बनावट आयडी कार्ड, कॅन्टीन कार्ड आणि बदलीचे हुकूम व्हॉट्सअॅपवर पाठवितात. नंतर ‘सामान गेटवर अडकले आहे’ किंवा ‘ट्रकचे भाडे द्यावे लागेल’, असे सांगून आधी टोकन रक्कम मागितली जाते. एकदा पैसे पाठविले की ते तुमचे बँक खाते रिकामे करतात.

आपणास कळकळीचे आवाहन आहे, की दिल्लगी करू नका. अनोळखी व्यक्तीने पाठविलेल्या ‘स्वस्त’ वस्तूंच्या आमिषाला बळी पडू नका.

**भेटल्याशिवाय पैसे नको :**


जोपर्यंत तुम्ही प्रत्यक्ष वस्तू पाहत नाही आणि माणसाला भेटत नाही, तोपर्यंत एक रुपयाही ऑनलाईन पाठवू नका.

आर्मीचे नाव वापरले तरी लक्षात घ्या, की भारतीय लष्करातील कोणताही जवान अशा प्रकारे सोशल मीडियावर सामान विकत सुटत नाही. त्यांच्या नावाचा गैरवापर केला जात आहे, हे ओळखा.

**लिंकवर क्लिक करू नका :**

कोणी ‘पेमेंट रिसीव्ह’ करण्यासाठी क्यूआर कोड पाठवला तर तो स्कॅन करू नका, त्याने पैसे येणार नाहीत तर तुमच्या खात्यातून पैसे जातील.

जर तुमची फसवणूक झाली असेल किंवा असे कुणी विक्रीबद्दल सांगत असेल, तर त्वरित १९३० या सायबर क्राईम हेल्पलाईनवर कॉल करा किंवा जवळच्या पोलीस स्टेशनशी संपर्क साधा. सतर्क राहा, सुरक्षित राहा! आपली कष्टाची कमाई अशा भामट्यांच्या घशात घालू नका.




**विकणे आहे**

अमळनेर मधील डी. डी. नगर रो–हाऊसमधील घर नं. ५ विकणे आहे.

संपर्क : 9422409651

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# ‘व्हेलेंटाईन डे’च्या निमित्ताने पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब करणे भारतासारख्या सुसंस्कृत लोकशाहीला घातक ठरू शकते

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


भारतात अनेक धर्म, पंथ, भाषा, जाती व धर्माप्रमाणे संस्कृती आहे. तरीही भारतीय युवा पिढी पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब करताना दिसतात, ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. आजच्या सोशल मीडियाच्या युगात युवा पिढीमध्ये भारतीय संस्कृतीचा दिवसेंदिवस विसर पडत असल्याचे मोठ्या प्रमाणात दिसून येते. १४ फेब्रुवारी म्हटले, की युगुलांमध्ये मोठी उत्सुकता दिसून येते. परंतु यात ते भारतीय संस्कृतीचे भान विसरतांना दिसतात. जगात संपूर्ण देश आपापल्या संस्कृतीची जोपासना करतात. परंतु बदलत्या काळात सध्या भारतीय युवा वर्ग पाश्चिमात्य देशांमधील संस्कृतीकडे वळताना दिसतात. ही अत्यंत गंभीर आणि चिंतेची बाब आहे. भारत आपल्या संस्कृतीच्या बळावर अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करीत आहे व जगात तिसरी महाशक्तीच्या रूपात उभरत असताना पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब करणे भारतासारख्या सुसंस्कृत लोकशाही देशाला घातक ठरू शकते. १४ फेब्रुवारीला ‘व्हेलेंटाईन डे’ संपूर्ण जगासह भारतीय युगुल मोठ्या थाटामाटात साजरा करतात. परंतु हा दिवस संपूर्णपणे भारतीय संस्कृतीच्या विरोधात आहे. ‘व्हेलेंटाईन डे’ साजरा करायला हरकत नाही. परंतु आपली संस्कृती जोपासलीच पाहिजे व कोणतेही कार्य संस्कृतीलाच धरून असावे. कारण भारतीय संस्कृती ही संपूर्ण जगात आगळीवेगळी आहे. तिला कुठेही तडा जाणार नाही, याची काळजी आजच्या युवा पिढीने घेतली पाहिजे.

भारतात अनेक जाती-धर्माचे लोक राहतात. त्याचप्रमाणे या पावनभूमीत अनेक भाषा, अनेक पंथ, अनेक जाती, अनेक धर्म, अनेक वेशभूषा व आगळीवेगळी संस्कृती आपल्याला पाहायला मिळते. आपण देशातील कोणत्याही कानाकोपऱ्यातून किंवा टोकावरून निघालो तर प्रत्येक ४० किलोमीटर अंतरानंतर आपल्याला वेगवेगळ्या भाषेचा गोडवा पाहायला मिळतो. अशा परीस्थितीत संस्कृतीची जोपासना आजच्या युगातील युगुलांनी करायला पाहिजे. आज जगातील अनेक देश भारतीय संस्कृती अवगत करण्याच्या मार्गावर आहेत. याचे उदाहरण कुंभमेळ्यात किंवा भारतीय सणांमध्ये दिसून येते. भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी अनेक देशांतील नागरिक भारत भ्रमण करताना दिसतात. भारतात ३६५ दिवसांतील प्रत्येक दिवसाला प्रत्येक धर्मामध्ये आगळेवेगळे महत्त्व असते, हे आपणा सर्वांना माहीत आहे.

योगाची सुरूवात भारतातूनच झाली आणि योगाला संपूर्ण जगाने स्वीकारले. जगातील मुस्लीम राष्ट्र असो किंवा कोणतेही राष्ट्र असो योगाला जास्त महत्त्व देतात. हीच जडणघडण भारतीय संस्कृतीमध्ये आहे, याची जाण युवकांनी ठेवली पाहिजे. त्याचप्रमाणे आयुर्वेदशास्त्र भारतातून विकसित झाले व हजारो पद्धतीची औषधीयुक्त वृक्ष भारतात पाहायला मिळतात. परंतु आपली युवा पिढी पाश्चिमात्य संस्कृतीकडे वळताना दिसते, हे भारतीय देवभूमीचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे, की ज्या ठिकाणी सर्वच धर्माचे लोक आनंदाने राहतात. सोबतच भारत हा ऋषी-मुनींचा, सुफी-साधू-संत, महाज्ञानी, क्रांतिकारक, स्वातंत्र्यसेनानी, थोर पुरुषांच्या अथक प्रयत्नाने सुसंस्कृत भारत देश मोठ्या डौलाने उभा आहे. यानिमित्त भगवान श्रीराम, भगवान गौतम बुद्ध, महंमद पैगंबर, गुरू गोविंदसिंग इत्यादींसह अनेक देवी-देवतांचे वास्तव्य या भारतभूमीत आपल्याला पाहायला मिळते. त्यांच्याच पुण्यायीने भारतीय संस्कृती विकसित झाली आहे. भारतावर सर्वच धर्मांच्या देवी-देवतांचा आशीर्वाद आहे. त्याचप्रमाणे हिंदू, मुस्लीम, शीख, ईसाई, बौद्ध, जैन इत्यादी धर्मांचा मोठा पगडा भारतीय संस्कृतीवर आहे. त्यामुळेच आज भारतात एकोप्याचे खेळीमेळीचे वातावरण दिसून येते. एवढी अफाट आणि शक्तिशाली भारतीय संस्कृती असताना भारतीय युगुलांनी व युवकांनी पाश्चिमात्य संस्कृतीचा किंवा पद्धतीचा अवलंब का करावा?

‘व्हेलेंटाईन डे’च्या माध्यमातून भारतीय संस्कृती धोक्यात येऊ शकते, याला नाकारता येत नाही. याचा विचार युवा पिढीतील युगुलांनी करावा. ‘व्हेलेंटाईन डे’ साजरा करताना भारतीय संस्कृतीनुसारच साजरा करावा. कारण कोणत्या ना कोणत्या मार्गाने पाश्चिमात्य पद्धती भारतात घर करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते, याला रोखण्याची नितांत गरज आहे. अन्यथा भारतीय संस्कृतीचे वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही. ही बाब आजच्या नवीन पिढीने लक्षात ठेवली पाहिजे. पाश्चिमात्य संस्कृतीचा अभ्यास अवश्य करावा. परंतु त्याचा अवलंब करू नका, ही आग्रहाची व कळकळीची विनंती आहे.

## ‘व्हेलेंटाईन डे’ची ऐशी तैसी..!



अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा भारत दौऱ्यावर असताना त्यांनी भारतीय संस्कृतीची प्रशंसा केली होती. परंतु अमेरिकेत गेल्यावर ६ फेब्रुवारी २०१५ ला भारतीय संस्कृतीवर ताशेरे ओढताना ते म्हणतात, की गेल्या काही वर्षांपासून भारतात असहिष्णुता वाढली आहे. याचाच अर्थ असा, की बोलताना सांगायचे की तुमची संस्कृती चांगली आहे आणि मायदेशी गेल्यावर दुसऱ्याच्या संस्कृतीला असहिष्णुता म्हणायचे व आपल्या पाश्चिमात्य पद्धतीचा प्रचार करायचा हा कुठला न्याय? मुख्य कारण म्हणजे त्यांना भारतात सर्व धर्माचे, जातीचे, पंथाचे लोक एकोप्याने राहतात. ही बाब रुतली असावी. त्यामुळे मित्रांनो पुन्हा सांगतो, की भारतीय संस्कृतीलाच स्वीकारावे व पाश्चिमात्य पद्धतीला टाटा-बाय-बाय करावे. कारण जगाच्या पाठीवर भारतीय संस्कृती अनभिज्ञ आहे.

भारतात रामायण, गीता, कुराण, बायबल, ग्रंथ या पाच भुजांनी बनलेला भारत व भारतीय संस्कृती आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीची जोपासना करणे हे प्रत्येक भारतीयांचे प्रथम कर्तव्य आहे. पुन्हा एकदा सांगू इच्छितो, की ‘व्हॅलेंटाईन डे’ या दिवसाला भारतीय संस्कृतीला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी युगुलांनी घ्यावी. भारतीय संस्कृती इतकी अबाध्य आहे की अनेक वृक्ष, फुले व फळे संस्कृतीला धरून आहे. त्यामुळे जगाच्या दृष्टिकोनातून भारतीय निसर्गसृष्टी आगळीवेगळी दिसून येते. आज भारत आपल्या दुश्मन देशालासुद्धा मदत करीत आहे, यामागचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती होय. आठवड्याचे ७ दिवस असतात. परंतु भारतीय संस्कृतीत प्रत्येक धर्मासाठी सातही दिवसांना वेगवेगळे महत्त्व दिसून येते. सूर्य, चंद्र, तारे संपूर्ण जग पाहते. परंतु भारतात यांची वेगवेगळ्या पद्धतीने जोपासना करून प्रत्येक धर्माच्या माध्यमातून पूजा-अर्चा केली जाते. भारतीय संस्कृतीला देवी-देवतांनी भरपूर काही दिले जे जगात तुम्हाला कुठेही पाहायला मिळणार नाही. आज भारतात हिवाळा, उन्हाळा आणि पावसाळा पाहायला मिळतो. यातूनच सप्तरंगी धनुष्य तयार होतो. वर्षाचे १२ महिने असतात. त्यात आपल्याला आगळेवेगळे रूप, रंग पाहायला मिळते. त्यामुळे भारतीय संस्कृतीची बरोबरी कोणताही देश करू शकत नाही आणि करणार नाही. याकरिता भारतीय संस्कृतीची जोपासना केलीच पाहिजे व पाश्चिमात्य संस्कृतीचा त्याग केला पाहिजे. कारण भारतीय संस्कृती ही जगातील अजुब्यातील एक अजुबा आहे.

आपण ‘व्हॅलेंटाईन डे’ साजरा करताना भारतीय संस्कृतीप्रमाणेच साजरा करावा. ‘व्हॅलेंटाईन डे’ च्या निमित्ताने आई-वडील, बहीण-भाऊ यांचा आदरतिथ्याने सन्मान करून त्यांचा आशीर्वाद घ्यावा. यातच आपली संस्कृती आहे. यामुळे प्रत्येकाच्या आयुष्यात नवीन ऊर्जा निर्माण होऊन नवचैतन्य दिसून येईल. या दिवसाला बदलते हवामान व वाढते प्रदूषण पाहता युगुलांनी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचा संकल्प करावा. त्याचप्रमाणे युगुलांनी हेही लक्षात ठेवले पाहिजे, की १४ फेब्रुवारी २०१९ ला पुलवामा येथे भारतीय सैन्यावर आतंकवाद्यांनी आत्मघाती हल्ला केला होता. यात ४० सैनिकांचा मृत्यू झाला. हा दिवस भारतासाठी अत्यंत दुःखद दिवस ठरला. त्यामुळे ‘व्हॅलेंटाईन डे’ साजरा करताना भारतीय संस्कृतीच्या माध्यमातून शहिदांना सुद्धा श्रद्धांजली वाहने गरजेचे आहे. शहिदांना कोटी-कोटी प्रणाम.

**जय हिंद! जय भारत!**

# व्हॅलेंटाईन डे : जागतिक संदर्भ, महत्त्व आणि भारतीय मानसिकता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

व्हॅलेंटाईन डे हा केवळ प्रेमाचा उत्सव उरला नसून तो एक जागतिक सामाजिक आणि व्यापारी इव्हेंट बनला आहे. मात्र, याभोवती असणारे वाद आणि परंपरा यांचा मेळ घालणे गरजेचे आहे.

### हा दिवस जगभरात साजरा केला जातो का?

हो, व्हॅलेंटाईन डे हा जगातील बहुतांश देशांमध्ये साजरा होतो. विशेषतः अमेरिका, युरोप, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि आशियातील अनेक देशांमध्ये याचे मोठे स्वरूप पाहायला मिळते. मात्र, काही इस्लामिक देशांमध्ये (उदा. सौदी अरेबिया, पाकिस्तान) यावर अधिकृत किंवा सामाजिक बंदी असते. जपान किंवा दक्षिण कोरियासारख्या देशांत हा दिवस साजरा करण्याची पद्धत थोडी वेगळी आहे, तिथे मुली मुलांना भेटवस्तू देतात.

### व्हॅलेंटाईन डेचे महत्त्व आणि इतिहास

हा दिवस सेंट व्हॅलेंटाईन यांच्या स्मृतीप्रित्यर्थ साजरा केला जातो. तिसऱ्या शतकात रोमचा सम्राट क्लॉडियस याने सैनिकांना लग्न करण्यास बंदी घातली होती (कारण लग्नामुळे सैनिक कमकुवत होतात, असे त्याला वाटायचे). सेंट व्हॅलेंटाईन यांनी या अन्यायाविरुद्ध जाऊन गुप्तपणे सैनिकांची लग्ने लावून दिली. या ‘प्रेमाच्या क्रांती’साठी त्यांना बलिदान द्यावे लागले.

**महत्त्व :** हा दिवस त्याग, विश्वास आणि प्रेमाची अभिव्यक्ती म्हणून ओळखला जातो.



### तरुणांसाठी प्रेरणा की ‘बिनकामाचे खुळ’?

या प्रश्नाकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोन आहेतः

**प्रेरणादायी बाजू :** प्रेम ही मानवी भावना आहे. आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी एक दिवस असणे यात गैर काही नाही. ही भावना केवळ प्रियकर-प्रेयसीपुरती मर्यादित न ठेवता आई-वडील, मित्र यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वापरली तर ती सकारात्मक ठरते.

**बिनकामाचे खुळ (व्यापारीकरण) :** आज व्हॅलेंटाईन डे हा भावनांपेक्षा ‘मार्केटिंग’चा विषय झाला आहे. महागड्या भेटवस्तू, पार्ट्या आणि दिखावा यामुळे मूळ उद्देश हरवला आहे. केवळ पाश्चात्यांचे अंधानुकरण करून गोंधळ घालणे हे निश्चितच ‘खुळ’ ठरू शकते.

### संघटनांचा विरोध योग्य की अयोग्य?

भारतात अनेक संघटना या दिवसाला ‘सांस्कृतिक प्रदूषण’ मानून विरोध करतात.

विरोधाचे कारणः भारतीय संस्कृतीत प्रेमाचे प्रदर्शन उघडपणे करणे अश्लील मानले जाते. तसेच, हा दिवस पाश्चात्य संस्कृती लादण्याचा प्रकार वाटतो.

**वास्तवाचा चष्मा :** हिंसा करून किंवा प्रेमी युगुलांना त्रास देऊन संस्कृती जपली जात नाही. विचारांनी आणि संस्कारांनी संस्कृती जपली जाते. त्यामुळे हिंसक विरोध करण्याऐवजी तरुणांना आपल्या संस्कृतीची गोडी लावणे हा योग्य मार्ग असू शकतो. व्हॅलेंटाईन डे विरुद्ध वसंत पंचमी अनेकांना वाटते की व्हॅलेंटाईन डे हा भारतीय संस्कृतीचा भाग नाही, पण भारताकडे स्वतःचा ‘प्रेमाचा उत्सव’ आहे.

**वसंत पंचमी :** हा ऋतू बदलाचा, निसर्गाच्या शृंगाराचा आणि कामदेवाच्या पूजनाचा काळ मानला जातो. प्राचीन काळी ‘मदनोत्सव’ साजरा केला जायचा, जो खऱ्या अर्थाने भारतीय ‘व्हॅलेंटाईन डे’ म्हणता येईल.

**तुलना :** व्हॅलेंटाईन डे हा एका व्यक्तीच्या बलिदानावर आधारित आहे, तर वसंत पंचमी निसर्ग आणि निर्मितीच्या उत्सवावर आधारित आहे. दोन्हीमध्ये ‘प्रेम’ हा सामायिक धागा आहे, पण पद्धती पूर्णपणे भिन्न आहेत.

**निष्कर्ष :** खरोखर हा प्रेमी प्रेमिकांचाच दिवस आहे का?

मूळ इतिहास पाहिला तर हा दिवस अन्यायाविरुद्ध लढण्याचा आणि निस्वार्थ प्रेमाचा आहे. आजच्या काळात तो प्रेमी युगुलांसाठी राखीव झाला असला, तरी प्रेमाला कोणत्याही चौकटीत बांधता येत नाही. भारतीय तरुणांनी या दिवसाचे केवळ बाजारीकरण न स्वीकारता, आपल्या संस्कृतीतील मर्यादा आणि पाश्चात्य जगातील चांगल्या गोष्टी यांचा समतोल राखायला हवा. थोडक्यात सांगायचे तरः प्रेम व्यक्त करायला दिवस कोणताही असो, त्यात ‘दिखाव्या’पेक्षा ‘आदर’ जास्त असणे महत्त्वाचे आहे.

# ‘व्हॅलेंटाईन डे’ला युवकांनी भारतीय संस्कृतीचे ठेवावे भान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. येथे अनेक धर्म, पंथ, भाषा, जाती, परंपरा, वेशभूषा आणि संस्कृती आढळतात. प्रत्येक ३०- ४० किलोमीटर अंतरानंतर भाषा बदलते, बोली बदलते, रीतिरिवाज बदलतात. मात्र, ‘भारतीयत्व’ कायम राहते. हीच आपल्या देशाची खरी ताकद आहे. अलीकडच्या काळात मात्र भारतीय युवा पिढी पाश्चिमात्य संस्कृतीकडे झुकताना दिसते, ही काही जणांच्या दृष्टीने चिंतेची बाब ठरते. सोशल मीडियाच्या प्रभावामुळे जीवनशैली, सण साजरे करण्याची पद्धत, वेशभूषा आणि विचारसरणीमध्ये बदल दिसून येत आहेत. १४ फेब्रुवारी आला की अनेक तरुण-तरुणींमध्ये उत्साह दिसतो. मात्र, या उत्साहात भारतीय संस्कृतीचे भान हरवू नये, ही अपेक्षा व्यक्त केली जाते.

भारतीय संस्कृती ही जगातील सर्वांत प्राचीन आणि समृद्ध संस्कृतींपैकी एक मानली जाते. योग, आयुर्वेद, निसर्गपूजा, कुटुंबव्यवस्था, सण-उत्सवांची परंपरा, वडीलधाऱ्यांचा सन्मान, अध्यात्मिक मूल्ये या सर्व गोष्टींनी भारताला वेगळे स्थान मिळवून दिले आहे. आज जगातील अनेक देश भारतीय योगपद्धती स्वीकारत आहेत, आयुर्वेदाचा अभ्यास करत आहेत आणि भारतीय सण-परंपरांविषयी आकर्षण बाळगत आहेत. कुंभमेळ्यासारख्या भव्य धार्मिक-सांस्कृतिक सोहळ्यांना परदेशी नागरिकही मोठ्या उत्साहाने उपस्थित राहतात, हे त्याचेच उदाहरण आहे.

भारत हा सर्व धमांना समान सन्मान देणारा देश आहे. हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन अशा विविध धर्माचे लोक येथे एकोप्याने नांदतात. ही सहिष्णुता आणि सर्वसमावेशकता ही भारतीय संस्कृतीची सर्वांत मोठी ओळख आहे.

ऋषी- मुनी, संत-महात्मे, समाजसुधारक, स्वातंत्र्यसैनिक यांच्या विचारांवर उभी राहिलेली ही संस्कृती आजही आपल्याला मार्गदर्शन करते. पाश्चिमात्य संस्कृतीचा अभ्यास करणे चुकीचे नाही. मात्र, तिचा अंधानुकरण करणे टाळणे आवश्यक आहे. आधुनिकता आणि परंपरा यांचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. व्हॅलेंटाईन डे सारखे दिवस साजरे करणे चुकीचे नाही. मात्र, त्याच वेळी भारतीय संस्कार, कुटुंबमूल्ये आणि सामाजिक जबाबदारी विसरता कामा नये.

या दिवशी केवळ प्रेमिकांपुरते मयादित न राहता आई-वडील, भाऊ-बहिण, मित्र, गुरुजन यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद घेणे, वृक्षलागवड करणे किंवा समाजोपयोगी उपक्रम राबवणे ही देखील भारतीय संस्कृतीचीच जपणूक ठरेल. १४ फेब्रुवारी हा दिवस देशासाठी आणखी एका कारणामुळे महत्त्वाचा आहे. २०१९ साली पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात आपल्या अनेक जवानांनी बलिदान दिले. त्यामुळे आनंद साजरा करतानाच शहीदांना श्रद्धांजली अर्पण करणे, देशभक्तीची भावना जपणे आणि राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव ठेवणे हेही तितकेच आवश्यक आहे. भारतीय संस्कृती ही निसगांशी नाते जोडणारी संस्कृती आहे. ऋतूचक्र, सण-उत्सव, पूजा-अर्चा, योग-ध्यान, आयुर्वेद, कुटुंबसंस्था या सर्व घटकांनी ती समृद्ध झाली आहे. त्यामुळे बदलत्या काळात आधुनिकतेला स्वीकारताना आपल्या मूळ मूल्यांना तडा जाऊ न देणे ही प्रत्येक युवक-युवतीची जबाबदारी आहे.

शेवटी एवढेच म्हणता येईल की, भारतीय संस्कृती ही केवळ परंपरा नसून ती जीवनपद्धती आहे. आधुनिक जगाशी स्पर्धा करत पुढे जात असताना आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगणे, तिची जोपासना करणे आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# ‘मना सांग पां रावणा काय झाले?’

मना सज्जना...



परम स्नेही मित्रहो,

समर्थ आपल्या आयुष्यात अकस्मात होणाऱ्या घडामोडी या कशा आपल्याच संचिताचे फळ असते हे स्पष्ट करताहेत. यासाठी ते लंकापती रावणाचे उदाहरण देतात.

**मना सांग पां रावणा काय झाले ।**
**अकस्मात ते राज्य सर्वे बुडाले ।**
**म्हणो नी कुडी वासना सांडी वेगी ।**
**बळे लागला काळ हा पाठी लागी ॥ १३ ॥**

रावण म्हणजे दशग्रंथी ब्राह्मण, महाविद्वान, पराक्रमी राजा. आपली राजधानी लंका ज्याने सोन्याने मढवून काढलेली होती, असा वैभवशाली परंतु गर्विष्ठ राजा. परंतु हा रावण जेव्हा आपल्या कृत्यामुळे सर्व विनाशाला आमंत्रण देतो तेव्हा त्याचे वैभवशाली राज्यही लयाला जाते. रावणाने सीता मातेचा धरलेला लोभ त्याला मृत्यूपर्यंत घेऊन गेला. म्हणजे सामर्थ्य, शक्ती, संपत्ती हे काहीही शाश्वत नसते. बऱ्या-वाईट मानवी कर्माच्या आधीन हे सारे आहे. त्याचे फलस्वरूप भोगणे क्रमप्राप्त होते. एक क्षुल्लक वाटणारी कृती देखील अतिशय विपरीत परीणाम घडवत असते. म्हणून मनाचे नियंत्रण आवश्यक आहे.

समर्थ येथे ‘अकस्मात’ या शब्दावर जोर देतात. आपल्या आयुष्यात अचानक घडणाऱ्या घटना- मानहानी, अपयश, आजार, नात्यांचे तुटणे या खरोखर अचानक असतात का? की त्या कालपर्यंत साचत गेलेल्या वासनांचे, गर्वाचे, अहंकाराचे, अविवेकाचे फळ असते? असा समर्थ मनाला प्रश्न करताहेत.

बहुतेक वेळेस अहंकार हाच आपल्या पतनाला कारणीभूत ठरतो. अहंकार हा उंच सुळक्यावर असलेल्या दगडी शिळेसारखा असतो. थोडासा धक्का लागला, की खाली जमिनीवर गडगडत येतो. आणि येताना विध्वंस करीत येतो. अहंकार ‘मी’पणाच्या शिखरावर उभा असतो; तर भक्ती ‘तू’ म्हणत जमिनीवर उभी असते. साधकाने सेवा, नामस्मरण आणि आत्मपरीक्षण हे अहंकार नियंत्रणाचे त्रिसूत्री साधन आत्मसात करून अहंकाराचे नियंत्रण करावे. कठोर टीका ऐकताना मन शांत ठेवणे,प्रत्युत्तर न देणे ही अहंकार तपासण्याची खरी कसोटी.

**‘मना सांग पां रावणा काय झाले?’**

हा प्रश्न रावणालाच नाही, तर प्रत्येक माणसाच्या विचार प्रवृत्त मनालाच आहे. महापराक्रमी रावण एका क्षणात नष्ट झाला नाही. त्याचा विनाश एका चुकीच्या निर्णयाने सुरू झाला. सीतेचा लोभ, हा केवळ स्त्रीविषयक लोभ नव्हता; तो होता ‘मी अपराजित आणि सर्व शक्तिमान आहे, काहीही करू शकतो’ या अहंकाराचा, परमोच्च बिंदू. विद्वत्ता, तपश्चर्या, शस्त्रसामर्थ्य, अपार संपत्तीया साऱ्यांवर गर्व करून त्याने विवेक गमावला. आणि विवेक हरपला, की विनाशाचा काळ पाठीशी उभा राहतो.

**‘बळे लागला काळ हा पाठी लागी.’**

समर्थ येथे काळाला शत्रू मानत नाहीत. काळ हा अटळ न्यायाधीश आहे. जेव्हा जेव्हा मन वासनांच्या ताब्यात जाते, तेव्हा तेव्हा काळ आपले काम चोखपणे पार पाडतो. म्हणून समर्थ अत्यंत आपुलकीने सांगतात.

**‘म्हणो नी कुडी वासना सांडी वेगी.’**

ही आईच्या काळजीतून आलेली सूचना आहे. कारण वासना हीच सर्वात मोठी कुडीमनाला अडकवणारी साखळी आहे. बेडी आहे. ही बेडी तोडणे आवश्यक आहे. आपण अनेकदा म्हणतो, की ‘हे अचानक झाले’, ‘हे माझ्या नशिबातच होते.’ पण समर्थ सांगतात, की हे नुसते नशीब नाही; हे आपल्या मनाने आजवर केलेल्या संगतीचे फलित आहे. आज जो लोभ किरकोळ वाटतो, उद्या तो रावणासारखा सर्वस्व हिरावून घेऊ शकतो. म्हणून समर्थ मनाला आधीच सावध करतात.

या श्लोकाचा गर्भित अर्थ असा आहे.

मन नियंत्रणात असेल तर तुमचे वैभव सुरक्षित आहे. मन वासनाधीन, विकारावश असेल तर ते विनाशाचे कारण ठरेल. समर्थांची शिकवण थोर आहेच. परंतु तिचा अंगीकार करणे हे मात्र साधकाची कठोर परीक्षा पाहणारे आहे.

**जय जय रघुवीर समर्थ..!**

**- भाऊसाहेब देशमुख, अमळनेर.**
**मो. : 94203 89541**

# महाशिवरात्रीच्या दिवशी घरीच करा रुद्राभिषेक

## महादेवांची होईल अपार कृपा..!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाशिवरात्रीच्या दिवशी मनोकामनापूर्तीसाठी अनेकजण व्रत पूजा आणि महादेवाच्या पिंडीवर अभिषेक करतात. शिवलिंगावर अभिषेक करण्याला हिंदू धर्मात अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. वेद पुराणानुसार रुद्राभिषेक करण्याचे विशेष लाभ मिळतात व महादेव देखील रुद्राभिषेकाने प्रसन्न होतात, असे मानले जाते. रुद्राभिषेक करण्यासाठी शिवमंदिरात जाऊन ब्राह्मणांच्या मार्गदर्शनात ही पूजा अनेकजण करतात. रुद्राभिषेक मुख्यत्वे सोमवार, श्रावणातील शुभ दिवस, प्रदोष व महाशिवरात्रीच्या दिवशी करण्यात येतो. यंदा महाशिवरात्री १५ फेब्रुवारी रोजी असून तुम्ही या दिवशी इच्छापूर्तीसाठी रुद्राभिषेक नक्की करू शकता. मात्र काही जणांना शिवमंदिरात जाणे शक्य होत नाही. त्यांनी आपल्या घरात देखील शिवलिंगावर विधिवत पद्धतीने रुद्राभिषेक स्वतः करू शकतात.

### रुद्राभिषेक करण्यासाठी साहित्य

शिवलिंग, रुद्राक्ष, चौरंग, पांढरे वस्त्र, पांढरी फुले, बेल, भस्म, पंचामृत, सुपारी, हळद-कुंकू, अष्टगंध, अक्षता, धूप, दीप, पंचपाळे, पळी, पाच फळे, अगरबत्ती, गाईचे तूप, चुर्म्याचा प्रसाद, दूध.

### रुद्राभिषेक पूजा मांडणी

- पूजाघरातील जागा स्वच्छ करून घ्यावी.
- एक चौरंग मांडावा. त्यावर पांढरे वस्त्र अंथरावे.
- घरात धातूचे शिवलिंग असल्यास उत्तम. ते शिवलिंग हातात घेऊन पंचपाळ्यात ठेवावे व जलाभिषेक करून स्वच्छ करावे.
- शिवलिंग चौरंगावर मांडावे. एका बाजूला अक्षता-फूल वाहून गणपतीच्या रूपात सुपारी चौरंगावर ठेवावी.

- फळे दुसऱ्या बाजूला ठेवावीत. धूप, दीप लावावा.

अशा पद्धतीने पूजा मांडावी. त्यानंतर पंचपाळ्यात शिवलिंग घेऊन रुद्राभिषेक करावा.



### रुद्राभिषेक विधी

- शिवलिंगाला पंचपाळ्यात ठेवावे.
- सर्वांत आधी जलाभिषेक करावा. त्यानंतर पंचामृताने अभिषेक करावा.
- अभिषेक करताना ‘ॐ नमः शिवाय’ या मंत्राचा उच्चार करावा.
- त्यानंतर पिंडीला अष्टगंध व भस्म लावावे व बेल, फुले अर्पण करावीत.
- यानंतर रुद्राक्ष अर्पण करून ‘ॐ नमो भगवते रुद्राय’ या मंत्राचे १०८ वेळा पठण करावे.
- त्यानंतर शिवोपासना मंत्रांचा जप करावा. मग भगवान शिवाच्या १०८ नामांचा जप करावा.
- यजुर्वेदाच्या १६ व्या आणि १८ व्या अध्यायातील श्री रुद्रमचे पठण करावे.
- श्री रुद्रमचे पठण करताना शांत एकाग्र चित्ताने स्पष्ट उच्चार करुन श्लोक म्हणावेत.

सर्वांत शेवटी महादेवाची आरती करून सर्वांना चुर्म्याचा किंवा दूध अथवा खिरीचा प्रसाद वाटून पूजा संपन्न करावी.

# इच्छापूर्तीसाठी शिवपुराणातील ‘हा’ उपाय महाशिवरात्रीला करून पाहा..!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान महादेव व पार्वती देवी यांच्या विवाहाचा पावन दिन म्हणजे महाशिवरात्री. हा दिवस सर्व भक्त मोठ्या उत्साहात साजरा करतात. आपल्या आराध्याला प्रसन्न करण्यासाठी भक्त व्रत आणि पूजन मनोभावे करतात. हिंदू धर्मात महाशिवरात्रीला पवित्र व धार्मिक पूजा पाठ होम हवन करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जातो. या दिवशी भक्त व्रत करून भगवान महादेवांची पूजा करतात. शिवलिंगावर बेलपत्र वाहून अभिषेक करतात. ज्या व्यक्तींना आपली मनोकामना पूर्ण करायची आहे त्यांच्यासाठी शिवपुराणात काही विशेष उपाय सांगितले आहेत. हे उपाय अत्यंत प्रभावी मानले जातात. यंदा महाशिवरात्री रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी आहे. विवाह, करिअर, आरोग्य, आर्थिक अशा सर्व बाबतीत यश मिळविण्यासाठी शिवपुराणात सांगितलेले हे सोपे उपाय महाशिवरात्रीच्या दिवशी करू शकता.

- अक्षता म्हणजेच तांदूळ यांना धार्मिक कार्यात महत्त्व आहे. कोणत्याही मंगल, शुभकार्यात अक्षता वापरतात. शिवपुराणानुसार अक्षता वापरून तुमची मनोकामना पूर्ण करू शकता. महाशिवरात्रीच्या दिवशी शिव मंदिरात अक्षता घेऊन जावे. शिवलिंगाच्या समोर बसून आपली मनोकामना भगवान महादेवांना सांगावी व मनात ‘ॐ नमः शिवाय’ या मंत्राचा जप करत १०८ अक्षता एक-एक करून शिवलिंगावर अर्पण कराव्यात.
- शिवपुराणात सांगितले आहे, की जर एखादी व्यक्ती आर्थिक समस्या कर्ज यामुळे चिंतेत असेल. पैशांचे प्रॉब्लेम सुरू असतील तर अशा व्यक्तींनी एक सोपा उपाय शिवरात्रीच्या दिवशी करावा. सकाळी किंवा सायंकाळी प्रदोषकाळात शिवमंदिरात जाऊ शकता. शिवलिंगावर एक मूठ हरभराडाळ अर्पण करावी लागेल. हरभराडाळ शिवलिंगावर अर्पण होणे अत्यंत शुभ मानले जाते. यामुळे आयुष्यातील दुःख, आर्थिक संकटे दूर होतात, असे मानले जाते.
- शिवपुराणात सांगितले आहे, की अक्षता, हरभराडाळ यांच्यासोबतच तुम्ही शिवलिंगावर हिरवे मूग अर्पण करावेत. हिरव्या मुगाची डाळ शिवलिंगावर अर्पण केल्यास रखडलेली कामे पूर्ण होतात, असे मानले जाते. एखादी अपूर्ण इच्छा जी अनेक उपाय करून पूर्ण होत नाही अशा गोष्टी हळूहळू पूर्ण होऊ लागतात, अशी मान्यता आहे. त्यामुळे शिवरात्रीच्या दिवशी शिवलिंगावर हिरवे मूग एक मूठ अर्पण करावे.
- शिवपुराणात सांगितले आहे, की उडिदाची डाळ शिवलिंगावर अर्पण करणे अत्यंत फलदायी मानले जाते. या उपायाने करिअरमध्ये प्रगती होते, असे मानतात. तसेच आरोग्याच्या समस्या देखील संपतात. उडीदडाळीचा संबंध हा शनीशी असल्याने शनीच्या साडेसाती किंवा शनी दोषाचा त्रास देखील कमी होतो, असे मानतात.
- शिवपुराणात विवाहासाठी किंवा मनपसंत जोडीदार मिळण्यासाठी एक विशेष उपाय सांगितला आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी तुम्ही शिवमंदिरात साखर घेऊन जा. भगवान महादेवांसमोर बसून आपली मनोकामना सांगा व एक मूठ साखर शिवलिंगावर अर्पण करा. या उपायाने वैवाहिक जीवनात देखील गोडवा येतो व इच्छित जोडीदाराशी लग्न होते असे मानतात.

# सूर्य देवाचा जन्म कसा झाला? जाणून घ्या पौराणिक कथा

**ग्लोबल महातेज वृत्ततसेवा**



हिंदू धर्मात पंचदेवांपैकी एक सूर्य देव मानले जातात. ज्योतिषशास्त्रातही सूर्याचे मोठे महत्त्व आहे. ज्योतिषनुसार सूर्याला ग्रहांचा राजा मानले जाते. हा मनुष्याच्या जीवनात मान-सन्मान, पिता-पुत्र आणि यशकारक मानला जातो. ज्योतिषनुसार सूर्य दर महिन्यात एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करतो. या प्रकारे बारा राशींमध्ये सूर्य एक वर्षात आपले चक्र पूर्ण करतो. सूर्याला आरोग्य देवता मानले जाते. सूर्यप्रकाशानेच पृथ्वीवर जीवन शक्य आहे. सूर्याला प्रतिदिन जल अर्पण केल्याने भक्ताला आध्यात्मिक लाभ प्राप्त होतो. सोबतच आरोग्य लाभही प्राप्त होतो. पण काय तुम्हाला माहिती आहे का सूर्य देवाचा जन्म कसा झाला होता. जाणून घ्या सूर्य देवाच्या जन्माची पौराणिक कथा.

### सूर्य देवाच्या जन्माची पौराणिक कथा

पौराणिक कथेनुसार पहिले हे संपूर्ण जग प्रकाशरहित होते. त्यावेळी कमलयोनी ब्रह्माजी प्रकट झाले. त्यांच्या मुखातून प्रथम शब्द ॐ निघाला जो सूर्याच्या तेजरूपी सूक्ष्म रूप होता. त्यानंतर ब्रह्माजींच्या चार मुखांतून चार वेद प्रकट झाले जे ॐ च्या तेजात एकाकार झाले. ही वैदिक तेजच आदित्य आहे जो विश्वाच्या अविनाशाचे कारण आहे. हा वेद स्वरूप सूर्यच सृष्टीच्या उत्पत्ती, पालन आणि संहाराचे कारण आहे. ब्रह्माजींच्या प्रार्थनेने सूर्याने आपल्या महातेजाला अकत्र करून स्वल्प तेजाला धारण केले.

सृष्टीच्या रचनेवेळी ब्रह्माजींचे पुत्र मरीची झाले. ज्यांचे पुत्र ऋषी कश्यप यांचा विवाह अदितीसोबत झाला. अदितीने घोर तपस्या करून भगवान सूर्याला प्रसन्न केले. ज्यांनी तिच्या इच्छापूर्तीसाठी सुषुम्ना नावाच्या किरणेच्या रूपात त्यांच्या गर्भात प्रवेश केला. गर्भावस्थेतही अदिती चान्द्रायणसारखे कठीण व्रतांचे पालन करत होत्या. तेव्हा ऋषी राज कश्यप यांनी क्रोधित होऊन अदितीला म्हटले, की ‘तू याप्रकारे उपवास ठेवून गर्भस्थ बाळाचा जीव का घेतेय’ हे ऐकून देवी अदितीने गर्भातील बालकाला आपल्या उदरातून बाहेर काढले. जो आपल्या अत्यंत दिव्य तेजाने प्रज्वलीत होत होता. भगवान सूर्य बाळाच्या स्वरूपात त्या गर्भातून प्रकट झाले. अदितीला मारिचम-अन्डम म्हटले जाण्याचे कारण म्हणजे हे बालक मार्तंड नावाने प्रसिद्ध झाले. ब्रह्मपुराणमध्ये अदितीच्या गर्भातून जन्मलेल्या सूर्याच्या अंशाला विवस्वान म्हटले गेले.

# शिवतांडव स्तोत्र पाठ केल्याने होतात हे फायदे, शिवरात्रीला एकदा अवश्य वाचा..!



शिवतांडव स्तोत्र हे रावणाने लिहिलेले अत्यंत शक्तीशाली स्तोत्र आहे. रावण हा महान शिवभक्त होता हे सर्वांनाच माहित आहे. रावणाला महादेवाकडून काही वरदान देखील मिळाले होते. त्याने आपल्या भक्तीने महादेवांना प्रसन्न केले होते. महादेवाची स्तुती असलेले हे शिवतांडव स्तोत्र नियमित वाचल्याने भक्तांना लाभ मिळतात असे म्हंटले जाते. आयुष्यातील सर्व अडचणी पीडा यांच्यातून मुक्ती मिळते. तसेच आपल्या आजूबाजूची नकारात्मकता शारीरिक व्याधी रोग यातून देखील मुक्ती मिळते त्यामुळे हे स्तोत्र पॉवरफुल समजले जाते. महाशिवरात्रीच्या दिवशी जर तुम्ही या स्तोत्राचे पठण केले तर महादेव प्रसन्न होऊन तुमच्यावर कृपा करतील. त्यामुळे खास महाशिवरात्रीच्या निमित्ताने हे शिवतांडव स्तोत्र तुमच्यासाठी....

## शिवतांडव स्तोत्र

जटाटवीगलज्जल प्रवाहपावितस्थले
गलेऽवलम्ब्य लम्बितां भुजंगतुंगमालिकाम्।
डमड्डमड्डमड्डमनिनादवड्डमर्वयं
चकार चंडतांडवं तनोतु नः शिवः शिवम ॥१॥

जटा कटा हसंभ्रम भ्रमन्निलिंपनिर्झरी ।
विलोलवी चिवल्लरी विराजमानमूर्धनि ।
धगद्धगद्ध गज्ज्वलल्ललाट पट्टपावके
किशोरचंद्रशेखरे रतिः प्रतिक्षणं ममं ॥२॥

धरा धरेंद्र नंदिनी विलास बंधुवंधुर-
स्फुरदृगंत संतति प्रमोद मानमानसे ।
कृपाकटा क्षधारणी निरुद्धदुर्धरापदि
कवचिद्विगम्बरे मनो विनोदमेतु वस्तुनि ॥३॥

जटा भुजं गपिंगल स्फुरत्फणामणिप्रभा-
कदंबकुंकुम द्रवप्रलिप्त दिग्वधूमुखे ।
मदांध सिंधु रस्फुरत्वगुत्तरीयमेदुरे
मनो विनोदद्भुतं बिंभर्तु भूतभर्तरि ॥४॥

सहस्र लोचन प्रभृत्य शेषलेखशेखर-
प्रसून धूलिधोरणी विधूसरांघ्रिपीठभूः ।
भुजंगराज मालया निबद्धजाटजूटकः
श्रिये चिराय जायतां चकोर बंधुशेखरः ॥५॥

ललाट चत्वरज्वलद्धनंजयस्फुरिगभा-
निपीतपंचसायकं निमन्निलिंपनायम् ।
सुधा मयुख लेखया विराजमानशेखरं
महा कपालि संपदे शिरोजयालमस्तू नः ॥६॥

कराल भाल पट्टिकाधगद्धगद्धगज्ज्वल-
द्धनंजया धरीकृतप्रचंडपंचसायके ।
धराधरेंद्र नंदिनी कुचाग्रचित्रपत्रक-
प्रकल्पनैकशिल्पिनि त्रिलोचने मतिर्मम ॥७॥

नवीन मेघ मंडली निरुद्धदुर्धरस्फुर-
त्कुहु निशीथिनीतमः प्रबंधबंधुकंधरः ।
निलिम्पनिर्झरि धरस्तनोतु कृत्ति सिंधुरः
कलानिधानबंधुरः श्रियं जगंद्धुरंधरः ॥८॥

प्रफुल्ल नील पंकज प्रपंचकालिमच्छटा-
विडंबि कंठकंध रारुचि प्रबंधकंधरम्
स्मरच्छिदं पुरच्छिंद भवच्छिदं मखच्छिदं
गजच्छिदांधकच्छिदं तमंतकच्छिदं भजे ॥९॥

अगर्वसर्वमंगला कलाकदम्बमंजरी-
रसप्रवाह माधुरी विजृंभणा मधुव्रतम् ।
स्मरांतकं पुरातकं भावंतकं मखांतकं
गजांतकांधकांतकं तमंतकांतकं भजे ॥१०॥

जयत्वदभ्रविभ्रम भ्रमद्भुजंगमस्फुर-
द्धगद्धगद्वि निर्गमत्कराल भाल हव्यवाट्-
धिमिद्धिमिद्धिमि नन्मृदंगतुंगमंगल-
ध्वनिक्रमप्रवर्तित प्रचण्ड ताण्डवः शिवः ॥११॥

दृषद्विचित्रतल्पयोर्भुजंग मौक्तिकमस्रजो-
र्गरिष्ठरत्नलोष्टयोः सुहृद्विपक्षपक्षयोः ।
तृणारविंदचक्षुषोः प्रजामहीमहेन्द्रयोः
समं प्रवर्तयन्मनः कदा सदाशिवं भजे ॥१२॥

कदा निलिंपनिर्झरी निकुजकोटरे वसन्
विमुक्तदुर्मतिः सदा शिरःस्थमंजलिं वहन्।
विमुक्तलोललोचनो ललामभाललग्नकः
शिवेति मंत्रमुच्चरन्कदा सुखी भवाम्यहम्॥१३॥

निलिम्प नाथनागरी कदम्ब मौलमल्लिका-
निगुम्फनिर्भक्षरन्म धूष्णिकामनोहरः ।
तनोतु नो मनोमुदं विनोदिनींमहनिशं
परिश्रय परं पदं तदंगजत्विषां चयः ॥१४॥

प्रचण्ड वाडवानल प्रभाशुभप्रचारणी
महाष्टसिद्धिकामिनी जनावहूत जल्पना ।
विमुक्त वाम लोचनो विवाहकालिकध्वनिः
शिवेति मन्त्रभूषगो जगज्जयाय जायताम् ॥१५॥

इमं हि नित्यमेव मुक्तमुक्तमोत्तम स्तवं
पठन्स्मरन् ब्रुवन्नरो विशुद्धमेति संततम्।
हरे गुरौ सुभक्तिमाशु याति नांयथा गतिं
विमोहनं हि देहना तु शंकरस्य चिंतनम ॥१६॥

पूजाऽवसानसमये दशवक्रत्रगीतं
यः शम्भूपूजनमिदं पठति प्रदोषे ।
तस्य स्थिरां रथगजेंद्रतुरंगयुक्तां
लक्ष्मी सदैव सुमुखीं प्रददाति शम्भुः ॥१७॥

॥ इति शिव तांडव स्तोत्रं संपूर्णम्॥

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)